-: प्रेसनोट दिनांक - ०४/०४/२०१९ :-

**आरोपी लोकसेवक विलास शंकरराव देसाई, वय-५२, पो.हे.कॉ. ब.नं. ९३५, आजरा पोलीस ठाणे, ता. आजरा, जि.कोल्हापूर वर्ग-३ यांनी लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार यांची आई, मावशी, मामी व मामेभाऊ यांच्याविरुध्द आजरा पोलीस ठाणे गु.र.नं.४७/२०१९, भा.द.वि.स.कलम ३२४, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे दिनांक १८/०३/२०१९ रोजी गुन्हा दाखल आहे. त्या दाखल असलेल्या गुन्हयाच्या कामी तक्रारदार व गुन्हयातील सर्व आरोपींना आजरा पोलीस ठाणेस हजर राहणेबाबत तक्रारदार यांना फोनवर कळविले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी दिनांक ०२/०४/२०१९ रोजी आजरा पोलीस ठाणेस जावून पोलीस हवालदार विलास देसाई यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी तक्रारदार यांना त्यांची आई, मावशी, मामी व मामेभाऊ यांच्याविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाचा तपास मी करत आहे. तुम्हाला गुन्हयाच्या तपासकामी माझेकडून मदत पाहिजे असल्यास, तुम्ही मला २५००/- रुपये द्या, मग मी तुम्हा सर्वांना गुन्हयामध्ये मदत करतो असे सांगून तक्रारदार यांच्याकडे २५००/- रुपये लाचेची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी आजरा पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार विलास शंकरराव देसाई यांचेविरुध्द आज दिनांक ०४/०४/२०१९ रोजी तक्रारी अर्ज दिला.

तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे आज दिनांक ०४/०४/२०१९ रोजी शासकीय पंच साक्षीदार यांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये आजरा पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार विलास शंकरराव देसाई यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांची आई, मावशी, मामी व मामेभाऊ यांच्याविरुध्द आजरा पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करतो असे सांगून २५००/- रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम लागलीच आजरा पोलीस ठाणेस घेवून येण्यास सांगितलेचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे आज दिनांक ०४/०४/२०१९ रोजी आजरा पोलीस ठाणेचे पोलीस हवालदार विलास देसाई यांचेविरुध्द आजरा पोलीस ठाणेस सापळयाचे आयोजन केले असता, पोलीस हवालदार विलास देसाई यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांची आई, मावशी, मामी व मामेभाऊ यांच्याविरुध्द आजरा पोलीस ठाणेस दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मदत करतो असे सांगून २५००/-रुपये लाचेची मागणी करुन ती पंच साक्षीदार यांचे समक्ष शासकीय आजरा पोलीस लाईन, रुम नं.२ येथे स्विकारली असता त्यांना रंगेहात पकडणेत आले असून त्यांच्याविरुध्द आजरा पोलीस ठाणे, ता.आजरा, जि.कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.संदिप दिवाण पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे वश्री. दिलीप बोरस्ते, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.गिरीष गोडे, पोलीस उपअधीक्षक यांचे मार्गदर्शना नुसार, श्री.मारूती पाटील,पोलीस निरीक्षक, सफौ. शाम बुचडे, पोना.शरद पोरे व पोकॉ. रुपेश माने,चालक पोहेकॉ.सुरज अपराध ॲन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर यांनी केली आहे.

**तसेच यातील आरोपी लोकसेवक विलास शंकरराव देसाई, वय-५२, पो.हे.कॉ.ब.नं. ९३५ यांचेविरुध्द यापुर्वी सन-२०१६ मध्ये भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गडहिंग्लज पोलीस ठाणे, गु.र.नं. १९१/२०१६ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदरचा गुन्हा सध्या न्यायप्रविष्ठ आहे.**

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२) मा.पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे**
**दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३**

**३) श्री.गिरीष गोडे , पोलीस उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर ८१०८६६०७०७ ०२३१/२५४०९८९.**

**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.**

**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३**